**प्रेस नोट** दिनांक:— १७/१०/२०१९

फिर्यादी यांच्या ठेकेदारी कामकाजाच्या अनुषंगाने लोकसेवकाने तक्रारदार यांचेकडे दरमहा हप्ता स्वरुपात लाचेची मागणी करुन ती खाजगी इसमाचे वतीने स्विकारल्याने मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन गुन्हा दाखल.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्र. | ३३/२०१९ |
| कलम | ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ ( सुधारणा—२०१८) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | आनंद दशरथ बावस्कर, वय ४४ वर्षे, धंदा—नोकरी (मुकादम—घन कचरा व्यवस्थापक) एम/प विभाग, महानगरपालिका, साण्डु गार्डन जवळ, चेंबुर (पश्चिम), मुंबई. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. ४४,०००/— |
| स्विकारलेलेली लाचेची रक्कम | रु. २५,०००/— |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार हे बृहन्मुंबई महानगरपालिकेत ठेकेदारीचा व्यवसाय करत असुन, सदर व्यवसायाकरीता त्यांना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन गोवंडी ते कुर्ला या दरम्यान असलेल्या संपुर्ण परिसरातील दगड, माती, गाळ इ. जेसीबी व डंपरच्या सहाय्याने उचलुन नेण्याचे काम दोन वर्षाच्या कालावधीकरीता प्राप्त झाले आहे. सदर कामकाजाचे देखरेखीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडुन दोन कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांनी गेल्या ११ महिन्यांपासुन तक्रारदार यांचे सुपरवाझर यांचेकडे प्रती महिना रु. ६०००/— एवढया रक्कमेची लाच देण्याकरीता तगादा लावला होता. दि. ११/१०/२०१९ रोजी तक्रारदार यांनी स्वत: प्रत्यक्ष लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांना भेटून त्यांच्या कामकाजाबाबत बोलणी केली असता, लोकसेवक यांनी ११ महिन्यांचे प्रत्येकी रु. ४,०००/— प्रमाणे रु. ४४,०००/— ची मागणी केली व सदर रक्कम तक्रारदार यांचे सुपरवाझर यांचेकडे देण्यास सांगितले. तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे तक्रार केली होती.<br><br>प्राप्त तक्रारीच्या पडताळणी दरम्यान दि. १७/१०/२०१९ रोजी तक्रारदार यांचे सुपरवाझर यांनी लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांचेशी संपर्क साधला असता, लोकसेवकाने सुपरवाझरला चेंबुर परिसरातील चहाचे स्टॉलजवळ भेटण्यास बोलाविले. सदर ठिकाणी सुपरवाझर व लोकसेवक यांची भेट झाली असता लोकसेवक यांनी नमुद लाचेची रक्कम डंपर चालक खाजगी इसम नामे नागराज रामण्णा बझरोलु यांचेकडे देण्यास सांगितले. त्याप्रमाणे खाजगी डंपर चालक नागराज रामण्णा बझरोलु यांने लाकसेवकाच्या वतीने सुपरवाझरकडुन लाचेची रक्कम रु. २५,०००/— स्विकारली. म्हणून लोकसेवक आनंद दशरथ बावस्कर यांस ताब्यात घेवुन गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.**


<u>संपर्क</u> : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ४०० ०३०.
संकेतस्थळ — acbmaharashtra.gov.in
ईमेल : (1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन - www.acbmaharashtra.net
टोल फ्री क्र. १०६४
दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
व्हॉट्स ॲप क्रमांक —९९३०९९७७००


( रमेश धुमाळ )
अपर पोलीस उप आयुक्त (१)
ला.प्र.वि., मुंबई विभाग.

Addl. Dy. Commissioner of Police, Anti Corruption Bureau

Scanned by CamScanner